उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

ARTHA, Poona 4

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80 Licence No. 175

वर्ष ३२ पुणे, बुधवार १६ फेब्रुवारी, १९६६ अंक ४

## विविध माहिती

**जमिनीचा कस ठरविण्याची फिरती केंद्रे**—शेतकऱ्यांना सकस शेती करण्यासाठी मदत देण्याचा एक भाग म्हणून जमिनीचा कस तपासून पाहण्याची फिरती केंद्रे लवकरच आपले काम सुरू करतील. खेडोपाडी हिंडून जमिनीचा कस तपासून त्याप्रमाणे खतांचा वापर कसा करावा ह्यासंबंधी शेतकऱ्याला सल्ला देण्याचे काम त्यांनी करावयाचे आहे. ही योजना मध्यवर्ती शेती खात्याने नियोजन समितीच्या सल्ल्याने आखली आहे.

**विनातिकीट जाणारे प्रवासी**—आग्नेय भारतामधील रेल्वे मार्गावर दररोज सुमारे ५ हजार प्रवासी विनातिकीट प्रवास करतात अशी माहिती जाहीर करण्यात आली आहे. १९६५ च्या सप्टेंबरअखेर पुऱ्या झालेल्या सहामाहीत जवळजवळ ९ लाख फुकटे प्रवासी पकडले गेले. गेल्या वर्षी ह्याच सहामाहीत ८॥ लाख फुकटे प्रवासी आढळून आले होते. खरगपूर ते टाटानगर ह्या मार्गावर फुकट्या प्रवाशांची संख्या सर्वांत अधिक असते.

**कोळशाच्या बदली तांदूळ**—भारत व पाकिस्तान ह्यांच्यातील संघर्ष सुरू होण्यापूर्वी पाकिस्तानला कोळसा पुरवून त्याच्या बदली २० हजार टन तांदूळ घेण्याच्या वाटाघाटी चालू होत्या. त्यावेळी तांदुळाचा मोबदला परदेशीय चलनात मिळण्याची मागणी पाकिस्तानने केल्यामुळे वाटाघाटी मोडल्या होत्या. आता एका पाश्चिमात्य देशाच्या मध्यस्थीने ही अडचण दूर करण्यात आली आहे. वाटाघाटी पुन्हा चालू झाल्या आहेत.

**कलकत्ता शहरात सर्वांत अधिक गोंगाट**—नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीच्या शास्त्रज्ञांनी कलकत्ता शहरातील आवाजांची व गोंगाटांची पाहणी केली असता त्यांना असे आढळून आले की कलकत्ता शहराची गणना ह्या दृष्टीने सर्वांत अधिक गोंगाट असलेल्या, जगातील शहरांत करावी लागेल. सर्वांत अधिक आवाज शहरातील वाहतुकीमुळे होतो. त्याच्या खालोखाल कारखाने व त्यानंतर आवाज मोठा करणाऱ्या ध्वनिक्षेपकांचा अनुक्रम लागतो. शहरातील बागा आणि खुली मैदाने ही सुद्धा आवाजाच्या उपसर्गापासून मुक्त राहिलेली नाहीत.

**हिंदी लष्कराचे औदार्य**—भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या युद्धात अमृतसर ते लाहोर मार्गावरील टेलिफोनच्या व्यवस्थेची मोडतोड झाली होती. लाहोर आघाडीवरील पाकिस्तानच्या प्रदेशातून ताश्कंद कराराप्रमाणे माघार घेण्यापूर्वी हिंदी लष्कराच्या एंजिनिअरांनी त्या व्यवस्थेची शक्य तितकी दुरुस्ती केली.

**स्वित्झरलंडमध्ये रशियाची बँक**—सोव्हिएट रशियाचे सरकार स्वित्झरलंडमध्ये आपल्या मालकीची एक बँक स्थापन करण्याचा विचार करीत आहे. ह्या बँकेचे सर्व भांडवल अर्थातच रशिया स्वतः पुरविणार आहे. स्वित्झरलंडची राजधानी बर्न येथे ती खोलण्यात येईल. गेल्या डिसेंबरमध्ये ह्या विषयासंबंधी उभयता सरकारांच्या प्रतिनिधींनी बोलणी केली आहेत. रशियातर्फे होणारी सोन्याची विक्री आणि पूर्व-पश्चिम व्यापारातून उद्भवणारी देणीघेणी ह्या संबंधीचे व्यवहार बँक पाहील.

**कुटुंब नियोजनासंबंधी प्रचार**—लोकसंख्येत झपाट्याने होणारी वाढ रोखण्यासाठी संयुक्त अरब प्रजासत्ताकाच्या सरकारने कुटुंबनियोजनाची देशव्यापी मोहीम सुरू केली आहे. मोहिमेतील एक भाग म्हणून २,२०० कुटुंबनियोजनकेंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. येथे येणाऱ्या लोकांना मदत करण्यासाठी समाजशास्त्रज्ञ व डॉक्टर्स ह्यांची योजना करण्यात आली आहे. त्याशिवाय १५ हजार परिचारिका व दाया कामावर ठेवण्यात आल्या आहेत. संततिनियमनाला उपयोगी पडण्यासारख्या ६० कोटी गोळ्या गरजूंना वाटण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

**पाकिस्तानी लष्कराला आनंद**—ताश्कंद करारात ठरल्याप्रमाणे भारत व पाकिस्तान ह्यांच्या सेना एकमेकांपासून दूर नेण्याचे कार्य व्यवस्थित रीतीने चालू आहे. भारताच्या पश्चिम आघाडीचे सेनापती नुकत्याच झालेल्या संघर्षाविषयी बोलताना म्हणाले की, हिंदी लष्कराने आपली मर्यादित कामगिरी पूर्णपणे पार पाडली. शत्रूला हिंदी लष्कराला सोईच्या वाटणाऱ्या ठिकाणी लढाई करावयास लावणे आणि भारतावरील योजलेला हल्ला मोडून काढणे हे हिंदी लष्कराचे उद्दिष्ट होते. पाकिस्तानी लष्करातील अधिकारी व सैनिक ह्यांनाही ताश्कंद करारामुळे आनंद झाला आहे.

**आयातीवरील निर्बंधाने अडचण**—कापड गिरणीसाठी लागणारी काही यंत्रसामग्री आयात करण्यास भारत-सरकारने मनाई केली आहे. आयात होणाऱ्या यंत्रसामग्रीऐवजी देशात तयार होणारी त्याच प्रकारची यंत्रसामग्री वापरावी असा आदेश देण्यात आला आहे. सरकारच्या ह्या हुकुमाबद्दल अखिल भारतीय सहकारी सुती गिरण्यांच्या संघटनेने चिंता व्यक्त केली आहे. नव्याने काढण्यात येणाऱ्या सहकारी सूतगिरण्यांना ह्या हुकमाचा तडाखा जाणवेल आणि त्या उभारण्यास विलंब लागेल असे संघटनेचे म्हणणे आहे.

### हिंदी यांत्रिक हत्यारांची पोलंडला निर्यात

पोलंडचे सरकार आणि भारताचे स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्यांच्या दरम्यान करण्यात आलेल्या करारास अनुसरून बंगलोर येथील हिंदुस्थान मशीन टूल्स कारखान्यात तयार झालेली ९ यांत्रिक हत्यारे पोलंडला निर्यात करण्यात आली आहेत. करारात ठरल्याप्रमाणे भारत पोलंडला ८० यांत्रिक अवजारे पुरविणार आहे. भारताकडून मोठ्या प्रमाणावर यांत्रिक हत्यारे घेण्याचा पोलंडचा हा पहिलाच व्यवहार आहे, ह्यापेक्षाही अधिक हत्यारांची मागणी पोलंडकडून येण्याची शक्यता आहे. बंगलोरच्या कारखान्यांतील यांत्रिक हत्यारांची युरोपमध्ये व अमेरिकेतही निर्यात करण्याच्या शक्यतेविषयी अंदाज घेण्यात येत आहे. संभाव्य बाजारपेठांच्या पाहणीस अनुसरून ऑस्ट्रेलिया न्यूझीलँड व पूर्व युरोपातील काही देश ह्या ठिकाणी विक्रीकेंद्रे उघडण्यात आली आहेत.

### मध्यप्रदेशातील वीज–उत्पादन बंद पडण्याची शक्यता

मध्यप्रदेशातील चंबळ नदीवर बांधण्यात आलेल्या गांधी सागर धरणावर वीज उत्पन्न करण्यात येते. परंतु गेल्या पावसाळ्यात ह्या धरणात पाण्याचा पुरेसा साठा झाला नाही; त्यामुळे धरणातील पाण्याची पातळी खूपच खालावली आहे. पाण्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे मार्च अखेर विजेचे उत्पादन बंद होण्याचीही शक्यता आहे. भोपाळ भागातील उद्योगधंद्यांना ह्या धरणावरील वीजच पुरविण्यात येते. तथापि, अमरकंटक येथे उभारण्यात येत असलेल्या औष्णिक वीजकेंद्रात तयार होणारी वीज भोपाळ भागात देण्याची व्यवस्था पुरी होत आली आहे. ही वीज इंदूर येथील गिरण्या-कारखान्यांनाही मिळू शकेल. उत्तर प्रदेशातील मातातिला वीजकेंद्रातील वीज ग्वाल्हेर भागातील उद्योगधंद्यांना मार्चपासून पुरविता येणार नाही असे त्या सरकारने मध्यप्रदेश सरकारला कळविले आहे.

### गुजरातमधील पहिली ग्रामीण बँक

राजकोटपासून १२० किलोमिटर असलेल्या एका खेड्यात गुजरातमधील पहिली ग्रामीण बँक स्थापन करण्यात आली आहे. स्टेट बँक ऑफ सौराष्ट्रने ही एकच नोकर असलेली बँक उघडली आहे. ही बँक स्टेट बँक ऑफ इंडियाची उपबँक आहे. बँकेला लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. पहिल्याच दिवशी एक लाख रुपयांच्या ठेवी गोळा करण्यात आल्या. ह्या प्रसंगी बोलताना गुजरातचे अर्थमंत्री म्हणाले की, अशा प्रकारच्या संस्थांनी ग्रामीण भागांतील पतीचे व्यवहार बळकट पायावर उभारण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे ग्रामीण भागांतील बचत एकत्र करून तेथील आर्थिक साधनसंपत्तीचा विकास करण्यासही त्या मदत करू शकतील.

### कामगारांच्या कर्जबाजारीपणाची व्याप्ती

गुजरात विद्यापीठाच्या अर्थशाखेतील काही अभ्यासकांनी अहमदाबादमधील कापडगिरणी कामगारांच्या कर्जबाजारी परिस्थितीची पाहणी केली आहे. तीन कापड गिरण्यांमधील ९८६० कामगारांची त्यांनी १९६४ मध्ये तपासणी केली असता असे आढळून आले की, त्यांच्यापैकी ८३ टक्के कामगार कर्जबाजारी होते. प्रत्येक कामगाराला सरासरीने ९५० रुपये कर्ज होते; ही रकम त्याच्या मासिक प्राप्तीच्या ६ पटीने अधिक आहे. बहुतेक कामगार आपल्या तुटपुंज्या मासिक प्राप्तीपैकी ६ ते २० टक्के भाग मुद्दल आणि व्याज ह्यांच्या फेडीसाठी देत होते. कामगारांपैकी फक्त १०·६ टक्के कामगारांना वडिलोपार्जित कर्जे होती. कर्जापैकी ९१·४ टक्के कर्जे केवळ जगण्यासाठी करावा लागणारा खर्च भागविण्यासाठी काढलेली होती.

### चष्म्यासाठी प्लॅस्टिकचे भिंग

जपानमधील एका रासायनिक कारखान्याने चष्म्यासाठी वापरण्यात येणारे प्लॅस्टिकचे भिंग तयार करण्यात यश मिळविले असून ते लवकरच विक्रीसाठी बाजारात धाडण्यात येणार आहे. नवीन प्रकारची ही काच नेहमीच्या काचेच्या मानाने वजनात हलकी भरते, तिचा पारदर्शकतेचा गुणही सिलिकापासून केलेल्या काचेपेक्षा अधिक सरस आहे. नेहमीच्या काचेवर चरे पडण्याची शक्यता असते; पण ह्या प्लॅस्टिकच्या भिंगावर चरे पडणार नाहीत. त्याशिवाय ती उष्णतेने कमी प्रमाणात तापेल आणि वाफेने अगर धुक्याने तिची पारदर्शकता कमी होणार नाही. किंमतीच्या दृष्टीने ही काच नेहमीच्या काचेइतकीच स्वस्त असेल.


**The Belgaum Bank Ltd., Belgaum.**

Estd : 1930. Scheduled Bank.

38 Branches in Mysore, Maharashtra States and Goa Territory.

**Board of Directors**

Shri A. R. Naik, B.A., B.Sc., LL.B., Chairman.
Shri. M. G. Herekar, Landlord and Banker, Vice-Chairman.
Shri. B. B. Potdar, B.A., LL.B. Pleader., Ex-President, Belgaum Borough Municipality.
Shri. G. V. Saraf, B.A., LL.B., Pleader., Ex-President, Shahapur Municipality.
Shri. S. M. Muttur, Merchant.
Shri. S. W. Kalaghatgi, Merchant.

Shri. H. S. Kulkarni, B. A., General Manager.

Regd. Office : 659-60, Raviwar Peth, Belgaum.

Deposits Exceed Rs. 3 Crcres, 21 Lakhs.

# अर्थ

बुधवार, १६ फेब्रुवारी, १९६६



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

### परदेशीय मदतीचा शोध

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. बी. आर. शेणॉय ह्यांनी मुंबई येथे परदेशीय मदतीचा शोध ह्या विषयावर बोलताना पुढील आशयाचे विचार व्यक्त केले आहेत. भारतामधील बचत वाढविण्यासाठी पुरेसे आणि कडक उपाय योजण्यात आले नाहीत तर परदेशीय मदतीवर अवलंबून राहण्याशिवाय दुसरा पर्यायच उपलब्ध होणार नाही. एखाद्या देशाचे आर्थिक आरोग्य जाणण्यासाठी तीन गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते : एक उत्पादन; दुसरी किंमती आणि तिसरी वेतन. गेली १६ वर्षे भारतात नियोजनाची कास धरण्यात आली आहे. पण तरीही भारताची निर्यात युद्धपूर्व कालातील निर्यातीच्या दोन तृतीयांशापेक्षा जास्त असण्याची शक्यता नाही. गेली १० वर्षे भारताची अर्थव्यवस्था स्वतःच्या पायावर उभी राहिल्यासारखी दिसत आहे. पण अर्थव्यवस्थेचे अंतरंग आणि बहिरंग ह्यांची सुदृढता परदेशीय मदतीवर आधारलेली आहे. मदत देणाऱ्या देशांची आपल्या अर्थव्यवस्थेवर काहीशी पकड बसलेली आहे ही गोष्ट खरी आहे. परदेशीय चलनाचा तुटवडा भरून काढण्यासाठी काही उपाय योजण्यात आले आहेत. त्यात एक उपाय सुवर्णरोख्याचा असून दुसरा संरक्षणासाठी परदेशातून येऊ देण्यात आलेल्या पैशाचा आहे. १९६५ डिसेंबर अखेर एकूण ५·१८५ किलोग्रॅम सोने जमा झाले. त्याची किंमत सुमारे २·७८ कोटी रुपये आहे. सुवर्णरोख्याच्या उपायाने २०० कोटी रुपये जमा झाले तरीसुद्धा त्यामुळे सध्याच्या बिकट परिस्थितीतून मार्ग निघणार नाही. त्यातून मार्ग काढण्यासाठी उत्पादन आणि किंमती ह्यांच्या मुळाला हात घातला पाहिजे. वाढत्या किमतींचे आणि वाढत्या उत्पादनखर्चाचे कारण, नसलेल्या साधनसंपत्तीची गुंतवणूक हे असून त्यामुळेच चलनवृद्धी आणि चलनाची फुगलेली किंमत हे प्रश्न उद्भवलेले आहेत.

---

### भारताला मिळणाऱ्या परदेशीय मदतीचा उपयोग

परदेशांकडून आर्थिक मदत घेण्यासाठी भारताने अनेक देशांशी करार केले आहेत. कराराप्रमाणे मिळणाऱ्या मदतीपैकी जवळजवळ ७० टक्के मदतीचा वापर करण्यात आला आहे. १९६५ च्या सप्टेंबर अखेर भारताने जे मदतीचे करार केले होते, त्यांच्यामार्फत एकूण ३,७६९ कोटी रुपयांची मदत मिळणार होती. परंतु प्रत्यक्ष मिळालेली मदत २,५३४ कोटी रुपयांची होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतरच्या १८ वर्षांत मिळालेल्या एकूण मदतीचा हा आकडा आहे. ह्या मदतीत अमेरिकेकडून वस्तूंच्या रूपाने मिळालेल्या मदतीचा आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून मिळालेल्या मदतीचा समावेश नाही. पूर्व युरोपातील देशांकडून जी मदत मिळाली तिचा वापर करण्याचा वेग अल्प आहे. रशियाने देऊ केलेल्या मदतीपैकी ५६·७ टक्के, युगोस्लाव्हियाने देऊ केलेल्या मदतीपैकी ३३·३ टक्के आणि झेकोस्लोव्हाकियाने देऊ केलेल्या मदतीपैकी १४·३ टक्के मदत सप्टेंबर १९६५ अखेर प्रत्यक्ष मिळालेली होती. ह्याच्या उलट पश्चिम जर्मनी, ब्रिटन आणि अमेरिका ह्यांनी देऊ केलेल्या मदतीपैकी ७५ टक्क्यांच्या वर मदत प्रत्यक्ष येऊन पोचली आहे. ह्या देशांकडून मिळणाऱ्या मदतीपैकी बरीच मदत निर्बंधरहित आहे. त्यामुळे अशा मदतीच्या उपयोगाचे प्रमाणही अधिक आहे. सप्टेंबर १९६५ अखेर अमेरिकेशी करण्यात आलेल्या कराराप्रमाणे १,२५० कोटी रुपयांची मदत मिळणार होती. त्या महिना अखेर प्रत्यक्ष हाती पडलेल्या मदतीचा आकडा ९६० कोटी रुपयांचा होता. करार करून मदत देण्याच्या बाबतीत अमेरिकेनंतर रशियाचा अनुक्रम लागतो. रशियाशी ४८४ कोटी रुपयांची मदत मिळण्याचे करार करण्यात आले आहेत. त्यानंतर पश्चिम जर्मनी, ब्रिटन, जपान, इटाली, इत्यादी देशांचे नंबर लागतात.

---

### मागासलेले देश त्याच त्याच चुका गिरवितात !

भारताच्या आर्थिक विकासाचे धोरण ठरविताना उद्योगधंद्यांवर वाजवीपेक्षा जास्त भर देण्यात आला व त्यामुळे शेतीची सुधारणा करण्याकडे दुर्लक्ष होऊन सर्व अर्थव्यवस्थाच डबघाईस आली ह्याची जाणीव अलीकडे तीव्रतेने झाली आहे. अविकसित देश आर्थिक भरभराट साधण्याच्या प्रयत्नात ही चूक देशागणिक करतात असे दिसते. संयुक्त अरब प्रजासत्ताकच्या सरकारनेहि आतापर्यंत उद्योगधंद्यांच्या वाढीवर अवास्तव भर दिला. इजिप्तच्या अर्थकारणावर दोन गटांचा प्रभाव आहे. पैकी एका गटाने निर्यात करणाऱ्या देशी उद्योगधंद्यांवर जोर दिला. परंतु कच्च्या मालाचा व यंत्रसामग्रीचा पुरेसा पुरवठा होऊ न शकल्याने ह्या गटाचे प्रयत्न फसले. शिवाय ह्या उद्योगधंद्यांच्या निर्यातीला पुरेशी बाजारपेठही मिळाली नाही. परिणामी सरकारला पूर्वेकडील व पश्चिमेकडील अशा दोन्ही देशांचे ऋण देणे झाले आणि लोकांना पुरेसे अन्न पुरविणे कठीण जाऊ लागले. प्रजासत्ताकाच्या सरकारने आता शेतीत अधिक भांडवल गुंतविण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या पाच वर्षांत शेतीच्या विकासासाठी १०० कोटींवर डॉलर्स खर्च करण्यात येणार आहेत. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमातील रकमेपेक्षा ही रक्कम दुपटीने अधिक असून ती उद्योगधंद्यातील भांडवल गुंतवणूक कमी करून उपलब्ध होणार आहे. इजिप्तमधील शेतीची सुधारणा करण्यासाठी पुढील पांच वर्षांत ५७·५ कोटी डॉलर्स खर्च करण्यात येणार असून ८५ कोटी डॉलर्स नवीन जमिनी लागवडीयोग्य करण्यासाठी पुरविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे नवीन कारखाने काढण्यापेक्षा आहेत त्या उद्योगधंद्यांची कार्यक्षमता आणि उत्पादन वाढविण्याकडे लक्ष देण्यात येणार आहे. इजिप्तच्या आर्थिक धोरणात झालेल्या ह्या बदलामुळे पाश्चिमात्य देशांकडून अधिक मदत मिळेल, अशी आशा त्या सरकारला वाटत आहे.

---

## औषधांचा दरडोई वापर भारतात कमी

भारतामधील दरडोई औषधाचा वापर इतर बहुतेक देशांच्या मानाने फारच कमी आहे. दरडोई दरसाल अवघी ३ रुपयांची औषधे भारतात वापरली जातात. अमेरिकेतील औषधांचा दरडोई वार्षिक वापर ८३ रुपयांचा आहे. पश्चिम जर्मनीचा ४३ रुपयांचा आणि ब्रिटनचा २८ रुपयांचा आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्येशी डॉक्टरांचे असलेले प्रमाणही भारतात अल्प आहे. भारतात ५,८०० लोकांमागे १ डॉक्टर असे प्रमाण आहे. तेच रशियात ५२५ लोकांसाठी एक आणि ब्राझिलमध्ये २०० लोकांसाठी एक असे आहे. इतर काही प्रगत देशांतील हे प्रमाण असे आहे:—पश्चिम जर्मनी ७३३ लोकांसाठी १; अमेरिका ७३५ : १; इटाली ६९१ : १; फ्रान्स ९३१ : १; डेन्मार्क ८३२ : १; बेल्जम ८२३ : १; जपान ९४३ : १; मेक्सिको १,८०० : १. पाचव्या पंचवार्षिक योजनेअखेर भारताला १,७५,००० डॉक्टर्सची गरज लागणार आहे. इतके डॉक्टर्स उपलब्ध झाले तर १९७५–७६ च्या सुमारास भारतात ३,५०० लोकांमागे एक डॉक्टर असे प्रमाण पडेल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात इस्पितळांतील रोग्यांसाठी २ लाख, ४० हजार खाटा उपलब्ध व्हाव्या असे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. हे उद्दिष्ट गाठण्यात आले तर ४९ खाटा आणि १,००० रोगी असे प्रमाण पडेल. एखाद्या देशाचे आरोग्य औषधाच्या खपावरून, अगर इस्पितळातील खाटांच्या संख्येवरून ठरवावयाचे झाल्यास भारतात उत्तम प्रतीचे आरोग्य नांदत आहे असे म्हणता येईल. वस्तुस्थिती मात्र ह्याच्या उलट असण्याचाच संभव अधिक आहे. अनेक रोग्यांना आधुनिक औषधे व उपचार घेणे परवडत नसल्याने औषधांचा कमी वापर हे खरे म्हणजे दारिद्र्याचेच लक्षण आहे.

---

## परदेशात शिकलेले विद्यार्थी परत पाहतात

शास्त्रीय ज्ञान आणि त्याचा तांत्रिक उपयोग ह्या बाबतीत आशियातील अनेक देशांप्रमाणे भारतही मागासलेला आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी सरकारमार्फत अगर खाजगी व्यवस्थेने अनेक भारतीय विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी परदेशात जातात. आशियातून शिक्षणासाठी परदेशात गेलेल्या व तेथून परत आलेल्या विद्यार्थ्यांची युनेस्कोतर्फे पाहणी करण्यात आली आहे. पाहणीसाठी निवडलेले विद्यार्थी भारत, इराण आणि संयुक्त अरब प्रजासत्ताक ह्या देशांतील होते. त्यांतील बहुतेक विद्यार्थी पश्चिम जर्मनी, ब्रिटन आणि अमेरिका ह्या देशांना गेलेले होते. पाहणीत असे आढळून आले की भारतात परतलेल्या बहुतेक हिंदी विद्यार्थ्यांना संधी मिळाल्यास ते पुन्हा परदेशी जाण्यास उत्सुक आहेत. ज्या देशात ते शिक्षणासाठी गेले होते त्या देशांशी ते समरस झालेले आढळून आले. त्या त्या देशांतील जीवनपद्धती, सामाजिक मूल्ये आणि कल्पना ह्यांचा त्यांनी अंगिकार केलेला होता. ह्या विद्यार्थ्यांपैकी ९० टक्के विद्यार्थ्यांचा परदेशीय वास्तव्यामुळे फायदा झालेला आढळून आला, आणि ६० टक्के विद्यार्थी आपल्या ज्ञानाचा फायदा आपल्या सहकाऱ्यांना व वरिष्ठांना देत असल्याचे दिसून आले. परदेशांतील लोक हिंदी लोकांच्या मानाने अधिक कामसू, प्रगतिशील आणि संयमशील असल्याचे मत बहुतेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. हिंदमधील लोक हुषार आणि उदार असले तरी परदेशातील नागरिकांच्या तुलनेने मागासलेले आणि कमी व्यवहारी असल्याचा अभिप्राय ह्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे. फक्त ३ टक्के विद्यार्थ्यांनी त्यांचा परदेशनिवास त्यांच्या व्यवसायांच्या दृष्टीने उपयुक्त ठरला नसल्याचे मत व्यक्त केले.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी : महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... | ५,३०,५१,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,५६,७५,००० |
| ठेवी | ... | ३६,१४,३२,००० |
| खेळते भांडवल | ... | ९१,४८,३५,००० |

भारतातील प्रमुख शहरी हुंड्या, बिले वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

डॉ. वा. शु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

" सिरमुले निकेतन ", १४३/१४६ भवानी पेठ

सातारा–शहर

*दि. १८-२-६६ पासून ठेवींवरील व्याजांच्या दरांत खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.*

## मुदतीच्या ठेवी

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | द. सा. द. शे. | ६=२५ |
| २ वर्षे | ,, | ६=५० |
| ३ वर्षे | ,, | ६=७५ |
| ५ वर्षे | ,, | ७=२५ |
| ७ वर्षे | ,, | ७=५० |
| ९ वर्षे व जास्त | ,, | ७=६२ |

सेव्हिंग्ज बँक खाते :—दि. १–२–६५ पासून ४ टक्के

*तसेच अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातील.*

याबाबत आमच्या कोणत्याही शाखेत अधिक माहिती मिळू शकेल.

## " भारतीयांची उपासमार तातडीने थांबवा "

### सर्व जगाला कळकळीची हाक

युनायटेड नेशन्सचे सेक्रेटरी जनरल ऊ थांट आणि युनायटेड नेशन्सच्या अन्न–शेती संघटनेचे प्रमुख डॉ. बी. आर. सेन ह्यांनी भारताला त्याच्या अन्नविषयक आणीबाणीच्या वेळी तातडीने मदत करण्याची सर्व जगाला जाहीर विनंती केली आहे. परिस्थितीचे गांभीर्य आणि हालअपेष्टा दूर करण्याची आंतरराष्ट्रीय जबाबदारी लक्षात घेऊन, सर्व देश व त्यातील जनता कोट्यवधी मानवांचे हाल वाचविण्याची पराकाष्ठा करतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे. सात हिंदी राज्यांतील १० कोटी लोकांना दुष्काळाचा तडाका बसला असून ५० ते ६० लक्ष लोकांना भाकरीच्या मोबदल्यात काम देण्याची पाळी येणार आहे. एक ते चौदा वर्षे वयाच्या दीड ते दोन कोटी मुलांवर तर भयंकर आपत्ती कोसळणार आहे. हे विनंतीपत्रक काढण्यापूर्वी भारत सरकारची संमती घेण्यात आलेली आहे.

ह्याच वेळी भारताने सावकार देशांना व संस्थांना १५० कोटी रुपयांची परतफेड करावयाची आहे. त्यांपैकी सुमारे ३७ कोटी रुपये इं. मो. फंडाला द्यावयाचे आहेत. वास्तविक ही परतफेड जुलै १९६५ मध्येच करायला हवी होती, पण त्या वेळी मार्च १९६६ पर्यंत मुदत मागून घेण्यात आली. २५ कोटी रुपये जागतिक बँकेला दिले पाहिजेत. इं. मो. फंड कर्ज–फेडीसाठी आणखी मुदत देईल किंवा जादा कर्जही देऊ शकेल. त्यातून जुने कर्ज भागविता येईल. पण नवे कर्ज मंजूर करतेवेळी भारतातील अर्थव्यवस्थेच्या सुस्थिरतेबद्दल त्याची खात्री व्हायला हवी; ह्याचा अर्थ, तुटीची अर्थव्यवस्था बंद करून भारताने चलनवाढ आटोक्यात ठेवायला हवी. जागतिक बँकेला नवे कर्जच द्यावे लागेल; कारण तिला कर्ज फेडीसाठी मुदतवाढ करण्याचा अधिकारच नाही. ग्रेट ब्रिटनने १० कोटी रु. चे कर्ज नुकतेच देण्याचे ठरविले आहे. त्यावर व्याज आकारण्यात येणार नाही. फ्रान्सने १·६ कोटी रुपयांची देणगी दिली आहे. ह्या कर्जाच्या आणि देणगीच्या रकमेतून धान्याच्या आयातीसाठी होणारा वाहतुकीचा खर्च भागवता येईल आणि धान्य पुरवठ्यासाठी आवश्यक बाबींची तरतूद करता येईल.

---

### लष्करी मालाच्या उत्पादनाला उत्तेजन

भारताचा पाकिस्तानबरोबर झालेला लढा तात्पुरता तरी मिटला म्हणण्यास हरकत नाही. परंतु अजूनही उत्तर सीमेवरील चीन आक्रमक पवित्र्यात उभा आहे. त्यामुळे भारताच्या लष्कराची तयारी अद्ययावत राखणे अजूनही निकडीचे आहे. लष्कराला लागणाऱ्या २० हजार प्रकारच्या वस्तू अजूनही आयात कराव्या लागतात. ह्या वस्तूंपैकी कोणत्याही वस्तूच्या उत्पादनास प्रारंभ करणाऱ्या हिंदी कारखानदारांना उत्तेजन देण्याचे भारताच्या संरक्षण उत्पादन खात्याने ठरविले आहे. आतापर्यंत ह्या वस्तू टेंडर्स मागवून खरेदी करण्यात येत असत. आता ही पद्धत तीन वर्षांपुरती रद्द करण्यात आली आहे. एखादा कारखाना एखादी वस्तू पुरविण्यास तयार असेल तर त्याच्याकडून ती वस्तू घेण्याचे ठरविण्यात आले आहे. पहिल्या वर्षी सर्व गरज त्या कारखानदाराकडून भागविण्यात येईल; दुसऱ्या वर्षी ८० टक्के भागविण्यात येईल आणि तिसऱ्या वर्षी ६० टक्के भागविण्यात येईल.

---

### जागतिक संस्थांकडे भारताची मदतीसाठी खटपट

भारतातील दुष्काळी परिस्थितीमुळे परदेशी हुंडणावळीचा प्रश्न फारच बिकट झाला असल्याने भारताने इंटरनॅशनल मोनेटरी फंड आणि जागतिक बँक ह्यांच्याकडे मदतीची याचना केली आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. भट्टाचार्य आणि फडणिशी खात्याचे आर्थिक सल्लागार डॉ. आय. जी. पटेल, हे नुकतेच त्यासाठी अमेरिकेला जाऊन आले. दुष्काळामुळे धान्याची आयात जास्त प्रमाणावर करावी लागत असून रोख पैसा देणाऱ्या पिकांच्या उत्पादनाची निर्गत रोडावणार आहे. टनाला १२ डॉलर, ह्या दराने १·२ कोटी टन धान्याची आयात करण्यासाठी १४·४ कोटी डॉलर आगबोटींच्या भाड्यावरच खर्च होतील. थायलँड व बर्मा ह्यांच्याकडून खरेदी करावयाच्या तांदळाची किंमत डॉलर्समध्ये द्यावी लागेल. इं. मो. फंडाकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करावयाची आहे. ह्या सर्वांसाठी लागणारी प्रचंड रक्कम डॉलर्समध्ये येत्या चार-पाच आठवड्यांत उभी करायला हवी. जागतिक बँक आणि इं. मो. फंड ह्यांनी कर्ज-फेडींची तहकुबी द्यावी किंवा नवी कर्जे द्यावी, अशी भारताची विनंती आहे. युनायटेड नेशन्सचे सेक्रेटरी जनरल, ऊ थांट ह्यांनी भारताच्या मदतीसाठी एक जाहीर विनंतीपत्र काढावे, अशीही एक सूचना आहे. युनायटेड नेशन्सच्या ११७ सभासदांपैकी २० पेक्षा अधिक देश भारताला विशेष मदत करण्यास समर्थच नाहीत; ह्या २० देशांशी भारताने प्रत्यक्षच बोलणी सुरू केलेली आहेत. अशा परिस्थितीत, भारतातर्फे ऊ थांट ह्यांच्या जाहीर विनंतीपत्रकापासून म्हणण्यासारखा फायदा होणार नाही; उलट भारताची उरलीसुरली अब्रू मात्र नाहीशी होईल.

---

### समाजसेवक श्री. श्रीनिवास नायक ह्यांची षष्ट्यब्दिपूर्ती

मडगावचे सुप्रसिद्ध व्यापारी आणि समाजसेवक श्री. श्रीनिवास दा. नायक ह्यांच्या वयाला १९जानेवारी रोजी ६०वर्षे पूर्ण झाली, त्यानिमित्त त्यांच्या चहात्यांनी अभिनंदनाचा समारंभ घडवून आणला. प्रसिद्धि-पराङ्मुख राहून सेवा करण्याची त्यांची वृत्ती, पोर्तुगीज काळात त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांना केलेली मदत, अस्पृश्यतानिवारणाचे कार्य, बालवीर संघटना, "व्हॉइस ऑफ इंडिया" ह्या राष्ट्रवादी पोर्तुगीज भाषेतील दैनिकाच्या द्वारा केलेला राष्ट्रवादाचा पुरस्कार, साहित्यसाधना, इत्यादी त्यांच्या कामगिरीचा गोमंतकीयांना पूर्ण परिचय आहे. त्यांच्या प्रामाणिक सल्ल्याचा अनेक लोकांना लाभ होत असतो. षष्ट्यब्दिपूर्तीनिमित्त त्यांनी निरनिराळ्या समाजोपयोगी संस्थांना २५,००० रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. त्यांना आरोग्यप्रद दीर्घायुष्य लाभो, अशी प्रार्थना आहे.

---

### लग्नखर्चासाठी शेतकऱ्यांना सहकारी संस्थांकडून कर्जे

शेतकऱ्यांना लग्नखर्चासाठीही कर्जे मिळण्याची लवकरच व्यवस्था होण्याचा संभव आहे. राजकोट जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षांनी नुकतेच सांगितले, की ह्या प्रश्नासंबंधी रिझर्व्ह बँकेशी वाटाघाटी चालू आहेत. रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांना अशा कर्जांची गरज पटली आहे. लग्नकार्यासाठी सहकारी संस्थांकडून कर्जे सध्या मिळत नाही. त्यामुळे शेतकरी सावकारांकडून कर्जे काढतात आणि त्याकारणाने सहकारी संस्थेकडून कर्ज मिळण्याची त्यांची पात्रता कमी होते.

---

### बँकांच्या कर्जांत औद्योगिक कर्जांची वाढ

शेड्यूल्ड बँकांनी दिलेल्या कर्जांची तुलना खाली करण्यात आली आहे. त्यावरून दिसून येईल की, ३१ मार्च, १९६४ रोजी कर्जांची रक्कम १८६५ कोटी रु. होती, ती ३१ मार्च, १९६५ रोजी २०९५ कोटी रु. झाली. म्हणजे, कर्जांत २३० कोटींची (१२%) वाढ झाली. मार्च, १९६५ अखेरच्या दोन वर्षांतील वाढ ४८४ कोटी रुपयांची आहे. त्यापैकी बहुतेक वाढ (७६%) उद्योगधंद्यांना दिलेल्या जादा कर्जांमुळे झाली आहे. बँकांच्या एकूण कर्जांत ह्या दोन वर्षांत १५·०% टक्के वाढ झाली, तर उद्योगधंद्यांना दिलेल्या कर्जांत १९·९% वाढ झाली. त्याकारणाने, एकूण कर्जांतील औद्योगिक कर्जांचा वाटा ५७·२% चा दोन वर्षांनी ६१·५% झाला. बाकीची बहुतेक कर्जे व्यापारी स्वरूपाची होती.

**शेड्यूल्ड बँकांनी दिलेल्या कर्जांची छाननी**
आकडे कोटी रु. चे

| | मार्च १९६३ रक्कम | मार्च १९६३ एकूणशी % | मार्च १९६४ रक्कम | मार्च १९६४ एकूणशी % | मार्च १९६५ रक्कम | मार्च १९६५ एकूणशी % |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| उद्योगधंदे | ९२१ | ५७·२ | ११०४ | ५९·२ | १२८७ | ६१·५ |
| व्यापार | ४४४ | २७·६ | ४८७ | २६·१ | ५३७ | २५·६ |
| आर्थिक संस्था | ८४ | ५·२ | ९९ | ५·३ | ९४ | ४·५ |
| शेती | ४ | ०·३ | ९ | ०·४ | ४ | ०·२ |
| व्यक्तिगत | ९९ | ६·१ | १०२ | ५·५ | १०९ | ५·२ |
| व्यावसायिक | १२ | ०·८ | १२ | ०·७ | १३ | ०·६ |
| इतर | ४६ | २·८ | ५२ | २·८ | ५० | २·४ |
| एकूण | १६११ | १००·० | १८६५ | १००·० | २०९५ | १००·० |


१९६३ ते १९६५ ह्या मुदतीत औद्योगिक कर्जे वाढली, त्यांतील बहुतेक रक्कम टेक्स्टाइल आणि इंजिनिअरिंग उद्योगांनी उचलली. टेक्स्टाइल गटाने उचललेल्या कर्जांत ८२ कोटींनी वाढ झाली, त्यापैकी ५० कोटींची वाढ कपास कापडाच्या गिरण्यांनी घेतलेल्या कर्जांमुळे झाली. मार्च १९६५ अखेरच्या, बँकेच्या एकूण कर्जांपैकी १२%, आणि औद्योगिक कर्जांपैकी २०% कर्जे एकट्या कपास कापडाच्या गिरण्यांकडे आहेत. त्यांची रक्कम २४७ कोटी रु. भरते. तागाच्या गिरण्यांना दिलेली कर्जे १५ कोटींनी वाढून ती ६६ कोटी रु. ची झाली. इंजिनिअरिंग गटाला दिलेली कर्जे दोन वर्षांत १९६ कोटी रु. वरून ३०४ कोटी रु. वर गेली.

३१ मार्च, १९६५ रोजी बँकांची व्यापारी कर्जे ५३७ कोटी रु. ची होती; ३१ मार्च, १९६३ रोजी ती ४४४ कोटी रु. ची होती. म्हणजे, त्यात ९३ कोटी रु. ची भर पडली. परंतु, एकूण कर्जांशी तुलना करता, त्यांचे प्रमाण २७·६% चे २५·६% वरती आले.

औद्योगिक कर्जांपैकी ८२·८% कर्जे लिमिटेड कंपन्यांना दिलेली आहेत; भागीदाऱ्या व इतर ह्यांना १२·८% कर्जे दिलेली आहेत. व्यापारी कर्जांपैकी भागीदाऱ्या व इतर ह्यांना ६८·९% कर्जे दिलेली असून लिमिटेड कंपन्यांना २७·९ कर्जे दिलेली आहेत.

शेतकी कर्जे १९६३ मध्ये ४ कोटी रु. ची होती, ती १९६४ मध्ये ९ कोटी रु. ची होऊन १९६५ मध्ये पुनः ४ कोटी रु. वर आली.

**अणुबाँब वाहणाऱ्या विमानांना बंदी**—अणुबाँब घेऊन जाणाऱ्या अमेरिकेच्या विमानांना स्पेनच्या प्रदेशावरून उड्डाण करण्याची बंदी स्पेनच्या सरकारने जाहीर केली आहे. गेल्या महिन्यात स्पेनवरून उड्डाण करताना अणुबाँब नेणारे एक अमेरिकन विमान आग्नेय स्पेनमध्ये कोसळले व त्यातील बाँब समुद्राच्या पाण्यात पडला. त्याचा शोध स्पेनचे व अमेरिकेचे नौदल अद्याप करीत आहे. आणिबाणीच्या प्रसंगी मात्र खास परवानगी घेऊन अमेरिकन विमानांना उड्डाण करता येईल.


महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)



Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV

(See Rule 8)

1. Place of publication 823, Shivajinagar, Poona 4
2. Periodicity of its publication — Fortnightly
3. Printer's name — S. V. Kale.
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
4. Publisher's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
5. Editor's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital — S. V. Kale 823, Shivajinagar, Poona 4

I, Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 16-2-1966

S. V. Kale
Signature of Publisher.

### लिपझिग प्रदर्शनात भारत भाग घेणार

पूर्व जर्मनीतील लिपझिग ह्या शहरात पुढील महिन्याच्या पहिल्या आठवड्यात औद्योगिक प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. ह्या वार्षिक प्रदर्शनात भारताने भाग घेण्याचा शिरस्ताच पडून गेला आहे. त्याप्रमाणे ह्या बाराव्या प्रदर्शनातही भारत आपली औद्योगिक उत्पादनक्षमता दाखविणारे दालन उघडणार आहे. तथापि, ह्या वेळी भारतामधील माल अधिक मोठ्या प्रमाणावर पाठविण्यात येणार आहे. प्रदर्शनाची मुदत दहा दिवसांची आहे आणि त्यात ७५ देशांतील १० हजार प्रदर्शक सामील होणार आहेत. प्रदर्शनाचा विस्तार १० लाख चौरस मीटर जागेवर पसरलेला असेल. त्याचे दोन भाग पाडण्यात येणार आहेत. एका भागात औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा माल आणि दुसऱ्या भागात ग्राहकांना लागणारा रोजखपाचा माल ठेवण्यात येणार आहे. हिंदच्या दालनाचा विस्तार १,१०० चौरस मीटर आहे. आणि त्यात १८४ कारखाने अगर औद्योगिक संघटना भाग घेणार आहेत. ह्या प्रदर्शनाची माहिती देताना पूर्व जर्मनीचे भारतामधील व्यापारी प्रतिनिधी म्हणाले की, लिपझिग मधील प्रदर्शन ताश्कंद येथील करारासारखीच महत्त्वाची घटना आहे. कारण, निरनिराळ्या राजकीय तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा करणारे अनेक देश ह्या प्रदर्शनाच्या निमित्ताने एकत्र येत आहेत. प्रदर्शन म्हणजे पूर्वेकडील देश आणि पश्चिमेकडील देश ह्यांना जोडणारा एक प्रकारचा दुवाच म्हटला पाहिजे. शांततामय सहजीवन आणि शांततामय स्पर्धा ह्यांचे प्रतीक म्हणून ह्या प्रदर्शनाकडे बोट दाखविता येईल. ह्या प्रदर्शनात खुद्द पूर्व जर्मन सरकार सर्वांत मोठ्या प्रमाणावर भाग घेणार आहे. पूर्व जर्मनीमधील ७०० प्रदर्शक आपआपला माल प्रदर्शनात मांडणार आहेत.

### ताश्कंद कराराचा चित्रनिर्मितीवर परिणाम

ताश्कंद करार झाल्यामुळे भारतामधील ५० चित्रपटनिर्मात्यांपुढे अडचणीची परिस्थिती उभी राहिली आहे. भारत-पाकिस्तान युद्धात हिंदी सैन्याने गाजविलेल्या मर्दुमकीवर आधारित चित्रपट काढण्याची तयारी अनेक निर्मात्यांनी केली होती. ताश्कंद करारातील एका कलमाप्रमाणे भारत व पाकिस्तान ह्यांनी परस्परांमधील विरोधी प्रचार थांबवावयाचा असल्याने ह्या निर्मात्यांची कुचंबणा झाली आहे. उभयता देशांतील संबंध बिघडू न देता भारत–पाकिस्तान युद्धासंबंधी कशा प्रकारचे चित्रपट काढावे ह्याविषयी काही निर्माते सरकारकडे स्पष्टीकरण मागणार आहेत. संकल्पित युद्धविषयक चित्रपटासाठी किती भांडवल गुंतविण्यात आले आहे ते समजण्यास मार्ग नाही. परंतु सहा चित्रपटनिर्मात्यांना ८० लाखांचे नुकसान सोसावे लागेल असे म्हणतात.

### कृत्रिम वस्त्रतंतूंची कापसाला स्पर्धा

वस्त्रे विणण्यासाठी लागणाऱ्या धाग्याच्या बाबतीत कापसाच्या धाग्याला अलीकडे कृत्रिम धाग्यांची स्पर्धा होऊ लागली आहे. कापसाचा वस्त्रव्यवसायातील खप वाढविण्याचे प्रयत्न करण्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या एका करारावर सही केली आहे. भारताशिवाय अमेरिका, मेक्सिको, संयुक्त-अरब-प्रजासत्ताक आणि स्पेन ह्यांनी करारास मान्यता दिली आहे. कापूस पिकविणाऱ्या कोणत्याही देशाला करारात सामील होता येईल. करारात सामील झालेले देश कापूस आणि त्यापासून तयार करण्यात येणाऱ्या वस्तू यांचा प्रचार करण्याची मोहीम हाती घेणार आहेत. पश्चिम युरोप व जपान येथे ही मोहीम चालू करण्यात येणार आहे.

### तंत्रज्ञांच्या सेवानिवृत्तीच्या वयात वाढ

भारतात तंत्रज्ञांचा तुटवडा अनेक क्षेत्रांत भासत आहे, आणि तो आणखी काही वर्षे तरी असाच चालू राहण्याचा संभव आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन गुजरात राज्य सरकारने काही प्रकारच्या तंत्रज्ञांच्या सेवानिवृत्तीच्या वयात वाढ केली आहे. ह्या तंत्रज्ञांना आतां वयाच्या ५९ व्या वर्षापर्यंत कामावर ठेवण्यात येणार आहे. मात्र त्यांना पुन्हा नव्याने कामावर घेतले गेले असे समजले जाईल. ह्या तंत्रज्ञांच्या वर्गात पुढील कामे करणारांचा समावेश करण्यात आलेला आहे. कारकुनी स्वरुपाची कामे करणारे पोलिस अधिकारी वगळून इतर पोलिस अधिकारी, लघुलेखक, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, एंजिनिअरिंग कॉलेजामधील आणि पॉलिटेक्निक शाळांतील शिक्षक वर्ग, पशूंचे डॉक्टर्स, वीज व यंत्रे ह्यांचे एंजिनिअर्स, शेतकी खात्यातील तांत्रिक कामे करणारे अधिकारी आणि शेतकी कॉलेजांमधील शिक्षक.

### नामरूप येथील खताचा कारखाना

आसामचे मुख्य मंत्री श्री. बी. पी. चलिहा ह्यांनी नामरूप येथे उभारण्यात येत असलेल्या खताच्या कारखान्याच्या उभारणीचे उद्‌घाटन केले. भारताचे फर्टिलायझर कॉर्पोरेशन खताचे अनेक कारखाने उघडणार आहे. त्या मालिकेतील हा ४ था खताचा कारखाना आहे. खत तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणून ह्या कारखान्यात नैसर्गिक वायूचा वापर करण्यात येणार आहे. नैसर्गिक वायूपासून खते तयार करणारा हा भारतामधील पहिलाच कारखाना होईल. नहारकाटिआ येथील तेलखाणीपासून मिळणारा नैसर्गिक वायू ऑइल इंडिआ ही कंपनी कारखान्याला पुरविणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी २० कोटी रुपये भांडवल लागणार असून त्यापैकी ६ कोटी रुपयांचा खर्च परदेशीय चलनात करावा लागेल. उत्पादनास प्रारंभ झाल्यावर दरसाल १॥ लाख टन खत कारखान्यात निर्माण करण्यात येईल.

### गुजरात राज्यातील नवे बंदर

गुजरात राज्यातील तापी नदीवरील मगदाला हे बंदर वाहतुकीस खुले करण्यात आले आहे. हे बंदर मुंबईच्या उत्तरेस १८० मैलांवर वसलेले आहे. अन्न आणि खते ह्यांची आयात करण्यास आणि पेंड व केळी ह्यांची निर्यात करण्यास ते सोयीचे आहे. आयात–निर्यात व्यापाराशिवाय किनाऱ्यानजीकच्या सागरी वाहतुकीसाठीही त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. कारण, मुंबई आणि भावनगर ह्यांच्या दरम्यान दुसरे बंदरच नाही. सुरत हे तापीवरील बंदर बरेच आत आहे. त्यामुळे त्या बंदरात शिडांची जहाजेच फक्त जा-ये करू शकतात. बंदराची उभारणी राज्य सरकारने केली असून त्याचा कारभारही तेच पाहणार आहे. गुजरात राज्यांत मध्यम प्रतीची ८ बंदरे आहेत. त्यात ह्या बंदराचा समावेश आहे.

**दूषित हवेची चाचणी**—टोकिओ शहरात रस्त्यावरील दूषित हवेची तावडतोब चाचणी करणारी फिरती मोटार काम करू लागली आहे. मोटारीत गंधकयुक्त वायू मोजण्याची आणि हवेतील आर्द्रता व तिचा वेग मोजण्याची उपकरणे असतील. त्याशिवाय ६०० मीटर उंचीपर्यंतची दूषित हवा तपासण्यासाठी रबरी फुगे सोडण्याची व्यवस्थाही तीत आहे. मोटारीची व्यवस्था टोकिओच्या हवामान खात्याने चालू केली आहे.

**हिंदी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण**—पश्चिम जर्मनीचे सरकार आणि प्रसिद्ध जर्मन वीज कंपनी सिमेन्स ह्यांनी एका संयुक्त करारावर सह्या केल्या आहेत. भारतामधील विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याची सोय ह्या कराराने करण्यात आली आहे. कंपनीच्या भारतामधील कामासाठी लागणारे तंत्रज्ञ भारतातच शिकवून तयार करण्याची व्यवस्था कंपनी करणार आहे. प्रथम १५० विद्यार्थ्यांची शिकण्याची सोय होईल. १९६८ पर्यंत त्यांची संख्या २६० पर्यंत वाढविण्यात येईल.

**मध्यप्रदेशातील उपक्रम**—मध्यप्रदेशातील जगदाळपूर जवळ दोन नमुनेदार खुले तुरुंग उघडण्यात येणार आहेत. ह्या तुरुंगात आदिवासी जमातीतील चांगल्या वागणुकीच्या गुन्हेगारांना ठेवण्यात येईल. तुरुंगातील आवार १५०० एकर इतके मोठे असेल आणि त्यांची मशागत करण्याची संधी गुन्हेगारांना देण्यात येईल. गुन्हेगारांचे सन्मान्य शेतकऱ्यात रूपांतर करण्याचा हा प्रयोग आहे.

**अन्न व शेतीसंघटनेचा अंदाज**—अवर्षणामुळे भारतात उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीसंबंधी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतीसंघटनेने अंदाज केला आहे. संघटनेच्या माहिती प्रमाणे भारतात १० कोटी लोकांना दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. त्यापैकी १·८ कोटी मुले आहेत. ही परिस्थिती ६ ते ९ महिनेपर्यंत टिकून राहील, असा अंदाज करण्यात आला आहे.

**उसाच्या चिपाडापासून कागद**—नगर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या संघटनेने उसाच्या चिपाडापासून कागद बनविण्याचा कारखाना काढण्याचा निर्णय घेतला आहे. कारखान्यासाठी २७ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. भांडवलाची उभारणी सहकारी साखर कारखाने, भारत-सरकार आणि जागतिक बँक मिळून करणार आहेत. महाराष्ट्र सरकारने एका ब्रिटिश कंपनीला कारखान्यासंबंधीचा अहवाल तयार करण्यास सांगितले आहे.

**रत्नागिरीजवळ कारखाना**—रत्नागिरी शहराजवळ सार्वजनिक मालकीच्या विभागात अल्युमिनमचा एक कारखाना स्थापन करण्यात येणार आहे. त्याच्या उभारणीसाठी सुमारे २२ कोटी रुपये लागतील. कारखान्याची जागा मुक्रर करण्यासाठी आलेल्या जर्मन तज्ज्ञांनी रत्नागिरीच्या आसपासच्या काही जागांची त्या दृष्टीने पाहणी केली. जागा ठरल्यापासून कारखाना एक वर्षाच्या अवधीत उभा राहील.

**सिनेमा फिल्म देण्याची तयारी**—भारतात सिनेमाला लागणाऱ्या फिल्मची मागणी वाढली असून त्यापैकी काही मागणी पूर्व जर्मनीचे सरकार भागविण्यास तयार आहे. सध्या भारताला लागणाऱ्या फिल्मपैकी ५० टक्क्यापेक्षा अधिक फिल्म पूर्वजर्मनीकडून पुरविण्यात येत आहे. कच्च्या फिल्मच्या तुटवड्यामुळे भारताच्या चित्रपट निर्मात्यांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

new ATTRACTIVE rates of interest on deposits

| SAVINGS DEPOSITS | FIXED DEPOSITS | RECURRING DEPOSITS |
|---|---|---|
| 4 % | Maximum 7 5/8 % according to period | upto 6 % Period 24, 30, 36 months. + An Attractive Gift of a Ball Pen |

THE BANK OF MAHARASHTRA LTD
1177, Budhwar Peth, Poona 2
6520

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.